## मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प अंतर्गत,
## राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समिती सभा व राज्यस्तरीय कार्यकारी समिती सभा
## दि.०९.१०.२०२० रोजीचे इतिवृत्त

राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजूरी समितीची संरचना व राज्यस्तरीय कार्यकारी समितीची संरचना (अध्यक्ष व सदस्य) एकच असल्याने दोन्ही सभा एकत्रित घेण्यात आलेल्या आहेत. सदर समित्यांच्या सभा मा.अध्यक्ष तथा मा. प्रकल्प संचालक, स्मार्ट यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०९.१०.२०२० रोजी कृषि आयुक्तालयातील सभागृहात संपन्न झाल्या. सदर सभेस उपस्थित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची यादी सोबत सहपत्रित केलेली आहे.

**सदर सभेत विषयनिहाय झालेली चर्चा व त्याअनुषंगाने घेण्यात आलेले निर्णय खालीलप्रमाणे:-**

| विषय. क्रं. | चर्चा व कार्यवाहीचे मुद्दे | जबाबदार कक्ष | कार्यावाहीचा कालावधी |
|---|---|---|---|
| १. | **प्रकल्प अंमलबजावणी कक्षनिहाय (PIU) मंजुर उपप्रकल्पनिहाय प्रगतीचा आढावा.**<br>अतिरिक्त प्रकल्प संचालक,स्मार्ट यांनी प्रकल्प अंमलबजावणी कक्षनिहाय मंजूर उपप्रकल्पांच्या गोषवाऱ्याचे सादरीकरण केले. तदनंतर संबंधित प्रकल्प अंमलबजावणी कक्षाच्या अधिकाऱ्यांनी उपप्रकल्पनिहाय प्रगतीचा आढावा सादर केला असता समितीत चर्चा होवून खालीलप्रमाणे सर्वांनुमते निर्णय घेण्यात आले.<br>**श्री. किसन मुळे,विभागप्रमुख, पीआययू, कृषि तथा संचालक, आत्मा यांनी मंजूर ५ उपप्रकल्पांचा आढावा सादर केला.** | | |
| | i. पथदर्शी मंजूर उपप्रकल्पातील समुदाय आधारीत संस्थानिहाय गोदाम घटकास विनाशुल्क् तांत्रिक मंजूरी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने द्यावी. | PIU MSWC | तातडीने |
| | ii. मका विक्री करताना आद्रतेचे प्रमाण महत्वाचे असल्याने मका उत्पादन क्षेत्रात (सिल्लोड,दोंडाईचा इ.) समुदाय आधारीत संस्थांची मागणी असल्यास Common Facility Center अंतर्गत मका वाळवणी यंत्रसामुग्री देण्यात यावी. | Concern PIUs | |
| | iii. समुदाय आधारीत संस्थांच्या (सीबीओ) संचालक / कर्मचाऱ्यांची क्षमतावृध्दी करुन भविष्यात त्यांच्यामार्फत थेट निर्यात करण्यासाठी प्रयत्न करावा. | Concern PIUs | |
| | iv. सर्वच उपप्रकल्पामध्ये गुणवत्तापुर्ण उत्पादन वाढीसाठी संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणांनी सातत्याने वेबीनारव्दारे मार्गदर्शन करणे आवश्यक आहे. | Concern PIUs | |
| | v. बारामती बाजार संपर्कवाढ उपप्रकल्पात निर्माण होणाऱ्या पायाभूत सुविधा APEDA प्रमाणित असाव्यात. | PIU Agri | |

| विषय. क्रं. | चर्चा व कार्यवाहीचे मुद्दे | जबाबदार कक्ष | कार्यावाहीचा कालावधी |
|---|---|---|---|
| | **मा. श्री. सचिंद्र प्रताप सिंह (भा.प्र.से.), आयुक्त पशुसंवर्धन तथा विभाग प्रमुख, पीआययू, पशुसंवर्धन यांनी पशुसंवर्धन कक्षाचा आढावा सादर केला.** | | |
| | i. लिसिअस हा खरेदीदार शेळी मांस कोठून प्राप्त करतो? काय दराने प्राप्त करतो? त्याची दैनंदिन मागणी किती? दुसरे खरेदीदार कोण? पुण्यातील HORECA विभागाची मागणी किती? McDonalds, KFC, Military Canteen यांची मागणी किती? इ.माहिती संकलित करावी. कृषिकुमार शेतकरी उत्पादक कंपनीची क्षमता बांधणी करुन त्यांनी भविष्यात स्वत: किरकोळ मांस विक्री करण्याचे नियोजन करावे. | PIU AHD | |
| | ii. समुदाय आधारीत संस्थांचे शेळया, मेंढया, कुक्कुट उत्पादने विक्रीसाठी ऑनलाईन प्लॅटफॉर्म विकसीत करावा. प्लॅटफॉर्म विकसीत करण्यासाठी NABCON किंवा उचित सल्लागाराची जागतिक बँकचे संपादन पध्दतीचा अवलंब करुन नेमणुक करावी. | PIU AHD | |
| | iii. राज्यातील पशुसंवर्धन विभागाचा पुढील २५ वर्षाचा दृष्टीक्षेप विकास आराखडा (Road Map) तयार करण्यासाठी अन्न व कृषि परिषद, रोम (Food and Agriculture Orgnaziation) यांचेशी ज्ञानाधीष्टीत सहयोगी संस्था म्हणुन सामंजस्य करार करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. परंतू FAO कडून प्रतिसाद मिळत नसल्याने श्री. मनिवनन पॅथी, टिटिएल,जागतिक बँक यांना FAO कडे पाठपुरावा करण्यासाठी प्रकल्पामार्फत ई-मेल पाठवावा. | PCMU | |
| | **श्रीमती. रुपा मिस्त्री, नोडल अधिकारी, पीआययू, माविम, यांनी मंजूर ४ उपप्रकल्पांचा आढावा सादर केला.** | | |
| | i. खरेदीदारासोबत सामजंस्य करार, समुदाय आधारीत संस्थांसमवेत अनुदान करार, कामांचे अंदापत्रके तयार करणे, अंदाज पत्रकांना संबंधित शासकीय विभागाची तांत्रिक मान्यता घेणे, स्व:हिस्सा उभारणी करणे इ. कामे तातडीने करावीत. | PIU MAVIM | |
| | ii. सीबीओ शेळ्या स्वत: निर्यात करतील अशी क्षमताबांधणी करावी.<br>iii. माविमने शेळी मासांचा महाप्लेश (Maha flesh) असा ब्रन्ड विकसीत करावा. | PIU MAVIM, AHD | |
| | **श्री. विक्रम यादव, प्रतिनिधी, पीआययू, महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवन्नोती अभियान (MSRLM) यांनी मंजूर ४ उपप्रकल्पांचा निहाय आढावा सादर केला.** | | |
| | i. नवीन गोदाम बांधकाम ऐवजी गोदाम भाडयाने घेणे शक्य आहे का? अस्तित्वातील गोदामांचा वापर करणे शक्य आहे का? ही बाब तपासावी.<br>ii. सर्व उपप्रकल्पामध्ये जागा उपलब्धता, अनुदान करार, अंदाजपत्रके तयार करणे, तांत्रिक मान्यता घेणे व स्व:हिस्सा उभारणी करणे इ. कामे तातडीने करावी. | PIU MSRLM | |
| | **श्री.एस.एस.सरसमकर, नोडल अधिकारी, पीआययू, महाराष्ट्र राज्य सहकार विकास महामंडळ (MCDC) यांनी मंजूर १० उपप्रकल्पांचा आढावा सादर केला.** | | |

| विषय. क्रं. | चर्चा व कार्यवाहीचे मुद्दे | जबाबदार कक्ष | कार्यावाहीचा कालावधी |
|---|---|---|---|
| | i. उपप्रकल्प अंमलबजावणीसाठी Collateral Management Agency (CMA) समवेत त्रिपक्षीय MCDC-CMA-CBO करार करावा. सदर करारात प्रत्येक पक्षाच्या जबाबदाऱ्या निश्चित करण्यात याव्यात. याचबरोबर शेतमाल तारण ठेवणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याचा करार CMA यांचे समवेत करावा. या करारात गोदाम भाडे, तारण कर्ज दर, कर्जाच्या अटी व शर्ती, गोदामातून शेतमाल खरेदीदारास विक्री करण्याची सुविधा, विमा नुकसान भरपाई इ. बाबींचा स्पष्ट उल्लेख असावा. वेअरहाऊसींग उपप्रकल्प अंमलबजावणीसाठी SOP (Standard Operating Procedure) निश्चित करावा. | PIU<br>MCDC | |
| | ii. भविष्यात MCDC ने सर्व्हेक्षणाव्दारे ज्या सहकारी संस्थांच्या गोदामात दुरुस्ती न करता CMA मार्फत धान्य साठवणूक तारण कर्ज शक्य आहे अशा सहकारी संस्थांची माहिती (DATA) संकलित करावी. या सर्व्हेक्षणाचे काम तातडीने हाती घ्यावे. | PIU<br>MCDC | |
| | iii. ७ वर्षापुर्वी राष्ट्रीय कृषि विकास योजनेतून (RKVY) जवळपास १८०० सहकारी संस्थांच्या गोदामांची दुरुस्ती करण्यात आलेली आहे. या संस्थांची माहिती संकलित करुन पुढील कॉल फॉर प्रपोजलमध्ये संबंधिताना अर्ज करण्याबाबत प्रवृत्त करावे. | PIU<br>MCDC | |
| | iv. Ergos ही CMA गोदावरी विकाससं, पालखेड विकाससं व जंगलेवाडी विकाससं या ३ सहकारी संस्थांसमवेत उपप्रकल्पात सहभागी होती. परंतू सद्यस्थितीत त्यांच्या काही तांत्रिक/वित्तीय अडचणीमुळे सदर CMA ने सहकारी संस्थांसमवेत MoU केलेले नसल्याने त्याऐवजी इतर मंजूर उपप्रकल्पातील CMA निवडण्यासाठी समितीने मान्यता द्यावी अशी विनंती श्री. प्रशांत चासकर यांनी केली. यावर असे ठरले की, इतर मंजूर ७ वेअरहाऊसींग उपप्रकल्पात कार्यरत असलेला CMA जर या ३ उपप्रकल्पात मंजूर उपप्रकल्पातील दरानेच काम करण्यास इच्छुक असल्यास आणि संबंधित सहकारी संस्थेची सहमती असल्यास त्याची निवड करण्यात यावी. या व्यतिरिक्त दुसरा CMA ची निवड करावयाची असल्यास विहीत पध्दतीचा अवलंब करावा. | PIU<br>MCDC | |
| | **श्री.युवराज सासवडे, नोडल अधिकारी, पीआययू, ग्राम सामाजिक परिवर्तन प्रतिष्ठान (VSTF) यांनी मंजूर ३ उपप्रकल्पांचा आढावा सादर केला.** | | |
| | i. द्राक्ष निर्यातदार कंपन्या शेतकऱ्यांना / शेतकरी उत्पादक कंपन्यांना काय दर देतात याची तुलना करावी. | PIU<br>VSTF | |
| | ii. जॉयस ॲग्री व्हीजन व परफेक्ट हार्वेस्ट शेतकरी कंपनीच्या बाजार संपर्कवाढ उपप्रकल्पाव्दारे सदर कंपन्यांच्या उलाढालीत मागील वर्षाच्या तुलनेत वाढ झालीच पाहिजे अशी अंमलबजावणी करावी. | PIU<br>VSTF | |

| विषय. क्रं. | चर्चा व कार्यवाहीचे मुद्दे | जबाबदार कक्ष | कार्यावाहीचा कालावधी |
| --- | --- | --- | --- |
| | iii. निर्मिती महिला संस्था, अहमदनगर व हॅपी रुटस यांच्यामधील तृणधान्य मुल्यसाखळी विकास उत्पादक भागीदारी उपप्रकल्पातील हॅपी रुटस या सहभागधारकाने माघार घेतली आहे. सद्यस्थितीत निर्मिती महिला संस्था व व्हीएसटीएफ नवीन खरेदीदाराचा शोध घ्यावा. | PIU VSTF | |
| | **एकंदरीतच सर्व उपप्रकल्पनिहाय आढाव्यानंतर समितीने सर्व प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणांसाठी खालीलप्रमाणे एकत्रित निर्देश दिले आहेत.** | | |
| | a) उपप्रकल्पासाठी समुदाय आधारीत संस्थांना तातडीने बँक कर्ज मिळण्यासाठी क्षेत्रिय यंत्रणेने तसेच पीआययूने पाठपुरावा करावा. | PIUs | |
| | b) प्रकल्प समन्वय व सनियंत्रण कक्षाने (PCMU) बँक अधिकाऱ्यांची कार्यशाळा आयोजित करुन प्रकल्पातील सीबीओना सुलभतेने कर्ज मिळणेसाठी आवश्यक सामजंस्य करार करावेत. प्रकल्प बँक खाते असलेल्या कॅनरा बँकने समुदाय आधारीत संस्थांसाठी Loan Product विकसीत करण्यासाठी पाठपुरावा करावा. | PCMU | |
| | c) उपप्रकल्पनिहाय सनियंत्रणासाठी (Tracking) श्री. तन्मय नाईक, माहिती तंत्रज्ञान तज्ञ, यांनी Google Form विकसीत करुन दर बुधवारी उपप्रकल्पांचा सनियंत्रण अहवाल सादर करावा. तसेच समुदाय आधारीत संस्थेतील सभासदांच्या विक्रीयोग्य शेतमालाची माहिती संकलित करण्यासाठी माविम यांनी विकसीत केलेले Kobo प्रणालीच्या धर्तीवर इतर सीबीओसाठी ॲप विकसीत करावे. | PCMU | |
| | d) सर्व उपप्रकल्पामध्ये सीबीओस खरेदीदार निवडीची मुभा राहील. | PIUs | |
| | e) मुल्यसाखळी विकास शाळा या घटकाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी कृषि व पशुसंवर्धन विभागाच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांशी इतर यंत्रणेच्या जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांनी योग्य समन्वय साधावा. | PIU Agri | |
| | f) कृषि विभागा मार्फत राबविण्यात येत असलेल्या मुल्यसाखळी विकास शाळेचे सनियंत्रण संचालक, आत्मा यांनी करावे. | PIU AHD | |
| | g) पशुसंवर्धन विभागाने मुल्यसाखळी विकास शाळा या घटकाच्या तातडीने मार्गदर्शक सुचना त्यांच्या क्षेत्रीय यंत्रणेस निर्गमित कराव्यात. | PIUs | |
| | h) सर्व उपप्रकल्पामध्ये गुणवत्तापुर्ण उत्पादन वाढीसाठी संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणांनी सातत्याने वेबीनार घेणे आवश्यक आहे. | PIUs | |
| | i) ज्या सीबीओ उपप्रकल्प राबविणेसाठी बँक कर्ज घेणार आहेत, त्यांना Agri Infrastructure Fund (AIF) योजनेतील व्याजदर सवलतीचा लाभ मिळणेसाठी पीआययूनी सहकार्य करावे. | PIUs | |
| | j) मंजूर उपप्रकल्पातील बांधकामाच्या गुणवत्ता राखण्याचे काम संबंधित प्रकल्प अंमलबजावणी यंत्रणेचे आहे. बांधकामा बाबत कोणत्याही तक्रारी आल्यास संबंधित संस्थेच्या संचालक व जबाबदार कर्मचारी / अधिकारी यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी. | PIUs | |

| विषय. क्रं. | चर्चा व कार्यवाहीचे मुद्दे | जबाबदार कक्ष | कार्यवाहीचा कालावधी |
|---|---|---|---|
| | k) भविष्यातील प्रस्तावित उपप्रकल्पामध्ये ट्रक्टर, गोदाम बांधकाम, अनावश्यक बांधकामे मंजूर करण्यात येवू नयेत. भविष्यातील प्रस्तावित उपप्रकल्पामध्ये प्राथमिक प्रक्रिया, दुय्यम प्रक्रिया, थेट विक्री, थेट निर्यात इ. मुल्यसाखळी विकासाच्या बाबींना प्राधान्य द्यावे. | PIUs | |
| | l) भविष्यातील उपप्रकल्पामध्ये अस्तिवात्वातील गोदामांचा वापर करावा. | PIUs | |
| | m) ज्या उपप्रकल्पामध्ये शेतमाल निर्यात अपेक्षित आहे त्या समुदाय आधारीत संस्थेच्या संचालकांना MSAMB मार्फत निर्यात प्रशिक्षण देण्यात यावे. | PIU MSAMB | |
| | n) ज्या उपप्रकल्पांची अंमलबजावणी माहे डिसेंबर २०२० अखेर सुरु न झाल्यास सदर उपप्रकल्प रद्द करण्यात यावे. | PIUs | |
| | o) एकंदरीतच स्मार्ट प्रकल्पाच्या माध्यमातून सहयाद्री शेतकरी उत्पादक कंपनी सारख्या १०० सीबीओ विकसीत कराव्यात. | PIUs, PCMU | |
| २. | **प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) निहाय प्रकल्प घटकांचा प्रगती आढावा.** संबंधित प्रकल्प अंमलबजावणी कक्षाच्या अधिकाऱ्यांनी घटकांच्या प्रगतीचा आढावा सादर केला असता समितीत चर्चा होवून खालीलप्रमाणे सर्वांनुमते निर्णय घेण्यात आले. | | |
| | **२.१) मा. श्री. दिपक तावरे, भा.प्र.से. विभागप्रमुख, पीआययू तथा CMD,MSWC यांनी घटकांचा प्रगती आढावा सादर केला.** | | |
| | i. गोदामात धान्य साठवणूक व तारण कर्ज या विषयी सीबीओंची क्षमता बांधणी करण्यासाठी प्रशिक्षण मोडयुल तयार करण्यात आले असून माहे डिसेंबर २०२० मध्ये प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याचे नियोजन आहे. त्यासाठी रामेती येथील सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत संचालक, आत्मा यांनी सहकार्य करावे. | PIU, MSWC & Agri | |
| | ii. माहिती व तंत्रज्ञान (I.T.) घटकांतर्गत M/s. Whrrl Fintech Solutions मार्फत Block Chain Technology चा पथदर्शी प्रकल्प तसेच महाराष्ट्र सहकारी बँकेबरोबर ई-वखारपावती व तारण कर्जासाठी केलेल्या कराराबाबत माहिती देण्यात आली. प्रकल्पांतर्गत वखार महामंडळाच्या राज्यातील उर्वरीत सर्व गोदामासाठी Block Chain Technology, ई-वखारपावती व तारण कर्जासाठी सेवा पुरवठादार संस्था निवडण्याविषयी समितीत असे ठरले की, Swiss Challenge पध्दतीचा अवलंब करुन संपादन प्रस्ताव जागतिक बँकेकडे सादर करावा. | PIU MSWC, PCMU | तातडीने |
| | iii. Silo उभारणीकरीता वैयक्तिक सल्लागाराकडून Feasibility Study करण्यासाठी जागतिक बँकेच्या संपादन प्रक्रियेप्रमाणे वैयक्तिक सल्लागार निवडीची कार्यवाही करावी. | PIU, MSWC | |
| | iv. समृध्दी महामार्गाच्या Nodes वर वखार महामंडळाने Agro logistic Park उभारणीकरीता सेवा पुरवठादार संस्थेकडून Feasibility Study करण्यासाठी जागतिक बँकेच्या संपादन प्रक्रियेप्रमाणे निवडीची कार्यवाही | PIU, MSWC | |

| विषय. क्रं. | चर्चा व कार्यवाहीचे मुद्दे | जबाबदार कक्ष | कार्यवाहीचा कालावधी |
|---|---|---|---|
| | करावी.<br>v. उद्योजक संस्थेसमवेत विकेंद्रीत गोदामाची उभारणी या घटकांतर्गत कांचनी फार्मर प्रोडयुसर कंपनी लि. चिन्नोरा,ता.वरोरा, जि.चंद्रपूर यांच्या महामंडळासमवेत गोदाम उभारणी प्रस्तावाबाबत चर्चा झाली असता सदर प्रस्ताव नियामक मंडळ (Governing Council) यांच्याकडे मंजूरीसाठी सादर करावा. | PIU MSWC, PCMU | |
| | **२.२) श्री. दिपक शिंदे, सरव्यवस्थापक, MSAMB यांनी घटकांचा प्रगती आढावा सादर केला.** | | |
| | i. शेतमाल निर्यातीसाठी सद्यस्थितीत कोणत्या पायाभुत सुविधा उपलब्ध आहेत? कोणत्या सुविधा आवश्यक आहेत? कोठे आवश्यक आहेत? इ. बाबींचा अभ्यास WTO च्या Standard and Trade Development Facility (STDF) मार्फत प्रस्तावित आहे. त्यांच्याकडे वारंवार पाठपुरावा सुरु आहे. परंतू त्यांचा प्रतिसाद नसल्याने याविषयी श्री. मनिवनन पॅथी, टिटिएल,जागतिक बँक यांना मा.प्रकल्प संचालक, स्मार्ट यांच्या स्वाक्षरीने पत्र द्यावे. | PIU MSAMB, PCMU | |
| | ii. Agriculture Export Training Course (5 Days duration) for CBOs व Commodity Specific Export Training Program (2 Days duration) for growers या प्रशिक्षणाचे मोडयुल्स मा.प्रकल्प संचालक, स्मार्ट यांना सादर करावे. | PIU MSAMB | |
| | iii. Division level training program for Nodal officers, Phytosanitary Authorities, Packhouse operators या प्रशिक्षणाचे Training Need Analysis (TNA) करण्यात यावे. | PIU MSAMB, | |
| | **२.३) श्री. नितीन काळे, प्रतिनिधी, संचालक पणन (DoM) यांनी घटकांचा आढावा सादर केला.** | | |
| | i. धान्यातील आद्रतेच्या प्रमाणानुसार पणन संचनालयाने दर निश्चित करावे. | PIU DoM | |
| | ii. शेतमालाचे Live Market Rate प्रसारीत करावे. | PIU DoM | |
| | iii. ज्या कृषि उत्पन्न बाजार समित्या बाजार सुधारणा स्विकारतील त्यांच्याच कर्मचाऱ्यांना स्मार्ट अंतर्गत प्रशिक्षण देण्यात यावे. | PIU DoM | |
| | **२.४) श्री. युवराज सासवडे, नोडल अधिकारी, VSTF यांनी घटकांचा प्रगती आढावा सादर केला.**<br>विविध पिक विकास परिषद (Commodity Stewardship Council) स्थापनेबाबत चर्चा झाली असता द्राक्ष पिक विकास परिषद स्थापनेचे काम करण्यास द्राक्ष बागायतदार संघ तयार आहे का? ही बाब तपासावी. | PIU VSTF | |
| | २.५) पीआययू, पुणे महानगरपालिका व महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कॉटन ग्रोअर्स, मार्केटींग फेडरेशन यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष सभेस उपस्थित नसल्याने त्यांनी स्वतंत्रपणे मा.अध्यक्ष तथा प्रकल्प संचालक, स्मार्ट यांना त्यांच्याकडील घटकांचा प्रगती आढावा सादर करावा. | PIU PMC, Mahacot | |

**विषय क्र.:- ३ कांचनी फार्मर प्रोडयुसर कंपनी लि., चिन्नोरा ता.वरोरा, जि. चंद्रपूर यांचा कापुस, हळद, सोयाबिन व डाळींच्या (हब आणि स्पोक मार्केटींग मॉडलेसह) मुल्यवर्धित उत्पादनासाठी बाजार संपर्कवाढ उपप्रकल्प (MAP) प्रस्ताव मंजूरी बाबत.**

सदर प्रस्ताव स्मार्ट नियामक मंडळ (Governing Council) यांच्याकडे मंजूरीसाठी सादर करावा असे समितीत ठरले.

**विषय क्र.:- ४** स्मार्ट प्रकल्पातंर्गत "डेक्कन ॲग्रो एक्सपोर्ट" व "श्री. महागणपती अग्रो प्रो. कं. लि. ठाणापुडे, ता.वाळवा, जि.सांगली" यांच्यामधील निर्यातक्षम भाजीपाला उत्पादक भागीदारी उपप्रकल्पातील घटक बदलास मान्यता मिळणेबाबत.

सदर शेतकरी उत्पादक कंपनीने मंजूर सविस्तर प्रकल्प आराखडयातील आवश्यकते नुसार काही घटकांमध्ये बदल प्रस्तावित केलेला होता. सदर बदल मंजूर करण्याबाबत प्रकल्प संचालक आत्मा, सांगली व संचालक, आत्मा यांनी शिफारस केलेली होती. सदर उपप्रकल्पातील घटक आवश्यकतेनुसार बदलले असून उपप्रकल्पाची पूर्वीची मंजूर रक्कम व प्रस्तावित रक्कमेत बदल नाही. यावर समितीत चर्चा होवून सर्वांनुमते खालीलप्रमाणे सुधारीत बदलास मंजूरी देण्यात आली.

| Sr. No | Subproject Components | Cost (Rs. Lakhs) | Revised Components | Revised Cost (Rs. Lakhs) |
|---|---|---|---|---|
| A | **Core investment in Sub-project** | | | |
| 1 | Mechanization- custom hiring centre<br>a) Mulching paper Spreader Machine -1<br>b) Drip Injector Machine-5<br>c) Planting Machine hand operated -6<br>d) HTP Pump Sprayer -4<br>e) Drone Sprayer-1 | 7.56 | No change | 7.56 |
| 2 | Storage pack house 1075 sqft@ 884/sqft | 9.51 | Storage Pack house with Indoor cold Storage Construction work 2117 sq. ft. @1181/ sq. ft Revised as per APEDA norms. | 25.01 |
| 3 | Global GAP Certification for 950 Farmers @ Rs. 3500/- farmer * if provided Project grant will be omitted | 33.25 | Slight change in physical no of farmers. | 31.78 |
| 4 | MRL Sampling - 300 Sample@ Rs.10000/- Sample | 30.00 | Component dropped. | 0 |
| 5 | Solar Cold Storage 5 Mt. | 12.00 | Solar cold storage cancelled and Planned regular Cold Storage capacity of-10Mt & New Precooling unit-3 Mt. | 18.9 |
| 6 | Grading table 2 | 0.47 | Physical units added by 6 no | 1.88 |
| 7 | Cretes-300 | 1.06 | Cretes quantity increase by 300 no | 2.12 |
| 8 | Transport vehicle Tata Pick-up 1.5 Tons Capacity | 8.05 | Transport Vehicle Capacity increased by 1Mt | 12.22 |
| 9 | Lab room material | 0.00 | New component added | 2.4 |
| | **Sub total** | **101.90** | | **101.87** |
| 10 | Pre-Op/ Preliminary Exp. | 5.10 | Pre-Op/ Preliminary Exp. | 5.09 |
| | **Total Cost - A** | **107.00** | **Total Cost - A** | **106.96** |

**विषय क्रं.:-५ मंजुर उपप्रकल्पातील कार्यान्वयन खर्च घटकाचे अनुदान ६० : ४० टक्के याप्रमाणात देणेबाबत**

राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समिती दिनांक १७.०३.२०२० रोजीच्या सभेत उपप्रकल्पातील कार्यान्वयन खर्चासाठी १००% अनुदान देय केले होते. परंतू स्मार्ट प्रकल्पाच्या वित्तीय व्यवस्थापन पुस्तिकेप्रमाणे (Finance Management Manual) उपप्रकल्पांतर्गत समुदाय आधारीत संस्थांना जास्तीत जास्त ६०% पर्यंत अनुदान देय आहे. यानुसार स्मार्ट कार्यालयामार्फत पत्र क्र.स्मार्ट/उपप्रकल्प/का.ख./७६८/२०२० दि.२५/०८/२०२० अन्वये संबंधित नोडल अधिकारी, प्रकल्प अंमलबजावणी कक्षांना शुध्दीपत्रकाव्दारे मंजूर उपप्रकल्पामधील समुदाय आधारीत संस्थांना कार्यान्वयन खर्च या बाबीसाठी ६०% अनुदान देय असल्याचे कळविण्यात आलेले आहे. याबाबत केलेली कार्यवाही समितीस अवगत केली असता समितीने कार्योत्तर मान्यता दिली.

**विषय क्रं.:-६ ऐनवळेचे विषय.**

मा. अध्यक्ष तथा मा.प्रकल्प संचालक, स्मार्ट यांच्या परवानगीने पुढीलप्रमाणे एक विषय ऐनवेळेचा विषय म्हणुन समिती समोर सादर करण्यात आला.

**विषय :- महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्पातील (MACP) विनावापर फर्निचर / साहित्य संचालक, पणन कार्यालयास निंलेखन दराने देणे बाबत.**

महाराष्ट्र स्पर्धाक्षम कृषि विकास प्रकल्प (MACP) दि. ३१.०३.२०१९ रोजी समाप्त झालेला आहे. सदर प्रकल्पातील काही जुने फर्निचर विनावापर पडून आहे. संचालक, पणन कार्यालयाने यातील काही फर्निचरची मागणी केलेली आहे. मागणी केलेले फर्निचर निंलेखन दरानुसार पणन संचनालय कार्यालयास देणे बाबत समितीसमोर चर्चा झाली असता यास समितीने सर्वांमुते मंजुरी दिली.

सर्व उपस्थितांचे आभार मानून मा.अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहिर करण्यात आले.

**अध्यक्ष,राज्यस्तरीय उपप्रकल्प मंजुरी समिती**
**व अध्यक्ष,राज्यस्तरीय कार्यकारी समिती**
**तथा प्रकलप संचालक, स्मार्ट, पुणे.**

---

**जा.क्र:-** स्मार्ट/SPAC-EC/MoM/ ९१७ /२०२०
स्मार्ट कार्यालय, पुणे दि.२० /१०/२०२०

**प्रत :- माहिती व कार्यवाहीस्तव**

१) विभाग प्रमुख (सर्व) प्रकल्प अंमलबजावणी कक्ष

२) नोडल अधिकारी (सर्व) प्रकल्प अंमलबजावणी कक्ष

३) समन्वयक व तज्ञ, (सर्व) प्रकल्प समन्वय व सनियंत्रण कक्ष